१४६ ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),
महामानव शिव शाहू फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी
हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.०२ ठाणे(प) ४००६०६
EMAIL ID : १४६election२०२४@gmail.com

जा.क्र./निवडणुक/कावि- १० /२०२४-२५ दि. ०६ / ११ /२०२४

निवडणुक तात्काळ

## // प्रसिध्दी पत्रक //

आज दिनांक ६/११/२०२४ बुधवार रोजी सकाळी ११.३० ते १२.३० वाजता १४६ ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघात मतदान जास्तीत जास्त होण्यासाठी मतदारांमध्ये (Sveep) जनजागृती करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

१४६ ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.०६/११/२०२४ रोजी तिवारी कॉलेज, मिरा रोड, पूर्व येथे सकाळी स्वीप (sveep) अंतर्गत जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रमास कॉलेजचा विद्यार्थी वर्ग, शिक्षक, कॉलेजचे अन्य कर्मचारी बऱ्याच संख्येने उपलब्ध होते. त्यांना मतदान जनजागृती करण्याबाबत आवाहन करण्यात आले. सेल्फी,स्टॅण्डी व बॅनर लावुन विद्यार्थ्यांसोबत मतदार करणार असे फोटो काढुन जनजागृती करण्यात आली. सेल्फी व स्टॅण्डी लावुन उपस्थीत सर्वांना मतदान करण्याची शपथ घेण्यात आली. राज्य निवडणुक आयोगाने आपणास ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत त्याचा लाभ घ्यावा काही अडचण असल्यास नजीकच्या प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधावा अशी माहिती दिली.

सदरचा कार्यक्रम हा मागील लोकसभा निवडणूकी २०२४ वेळी मतदान कमी झालेल्या भागातील मतदारांना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांमार्फत व त्यांच्या सोशल मिडीया ग्रुप मार्फत मतदान जनजागृती करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला. त्यावेळी सुमारे १९७ विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या वेळी मतदरांना आपले मतदान केंद्र कोठे आहे याची माहिती होण्याकरीता जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या QR कोड ची माहिती देण्यात आली.

१४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे श्री. इब्राहिम चौधरी, निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. अनिकेत मानोरकर अति. आयुक्त मि.भा.मनपा तथा नोडल अधिकारी (स्वीप), श्री. सचिन सांगळे, उप आयुक्त (शिक्षण विभाग), ठामपा, श्री. चेतन देवरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (शिक्षण विभाग), ठामपा यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.आयुक्त मि.भा.मनपा तथा नोडल अधिकारी, श्री. सुनील यादव, स्वीप पथक प्रमुख, श्री.कैलास शेवंते, तिवारी कॉलेज, मिरा रोड पूर्व चे श्रीम. सोमय्या फिलीप (अधिष्ठाता), डॉ. धीरज आर सिंग (उपनिबंधक), श्री. रोहन महाजन तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व स्वीप पथकातील कर्मचाऱ्यांच्या मार्फत सदरचा कार्यक्रम घेण्यात आला.

तरी दि. २०/११/२०२४ बुधवार या दिवशी सर्वांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन व मतदानाचा हक्क बजवावा आणि जास्तीत जास्त मतदान करावे व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्याबद्दल १४६ ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथकाने उपस्थीत सर्वांचे आभार मानले.

६.११.२०२४
सुनील यादव
सहाय्यक आयुक्त तथा नोडल
अधिकारी स्वीप